महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २२

# महाराजा सयाजीराव आणि हिंदू कोड बिल

देवदत्त कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २२

# महाराजा सयाजीराव
# आणि
# हिंदू कोड बिल

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि हिंदू कोड बिल
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ४२
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम,
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले, जि.
कोल्हापूर - ४१६११३
८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.


**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**


●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# हिंदू कोड बिल

धर्म, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रात सुधारणांचा 'पर्वत' उभा करणारे महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक भारताचे निर्माते आहेत. वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत सामान्य शेतकरी कुटुंबात जीवन व्यतीत केलेल्या निरक्षर सयाजीरावांनी आयुष्यभर इतिहास, धर्म, समाजशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान यासारख्या ज्ञानशाखांचा एक 'आदर्श' विद्यार्थी म्हणून केलेला व्यासंग त्यांच्या प्रशासकीय वाटचालीत महत्त्वपूर्ण ठरला. या व्यासंगाबरोबरच १८८७ च्या पहिल्या परदेश प्रवासापासून सयाजीरावांनी जाणीवपूर्वक जोपासलेल्या तुलनात्मक धर्मविचारामुळेच सयाजीराव महाराज धर्म ही संकल्पना अतिशय पद्धतशीरपणे समजून घेऊ शकले. जगभरातील धर्म संकल्पनांमध्ये टोकाचे अंतर्विरोध दिसत असले तरी सर्व धर्मांचे मूलतत्त्व अंतिमत: मानव कल्याण हेच आहे ही त्यांची दृष्टी जगातील सर्व धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून सयाजीरावांनी कमावली होती.

विविध धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून मानव कल्याणाचे 'सार' आत्मसात केलेले सयाजीराव महाराज आपल्या संस्थानातील स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आयुष्यभर प्रयत्नरत राहिले. भारतीय स्त्रियांच्या मुक्तीचे 'प्रवेशद्वार' मानल्या गेलेल्या हिंदू कोड बिलाच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेले प्रयत्न आपण सर्व जाणतोच. फेब्रुवारी १९४९ पासून ते नोव्हेंबर १९५१ पर्यंत म्हणजे जवळजवळ दोन वर्षे घटना समितीत हिंदू कोड बिलावर वादळी चर्चा झाली. या बिलाला पाठिंबा मिळत नाही हे समजल्यावर याचा निषेध म्हणून नोव्हेंबर १९५१ ला बाबासाहेबांनी कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर गेली ६०-७० वर्षे भारतातील स्त्रीवादी चळवळ या बिलाच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी संघर्ष करत आहे. परंतु सयाजीराव महाराजांनी १९०५ पासूनच आपल्या बडोदा संस्थानात हिंदू कोड बिलातील कायद्यांची अंमलबजावणी सुरू केली होती. हा इतिहास दुर्दैवाने आपल्याला माहीत नाही.

१९०५ ते १९३३ या कालखंडात सयाजीरावांनी बडोद्यात अंमलबजावणी केलेले हिंदू कोड बिल समजून घेण्याआधी भारतातील हिंदू कोड बिलासंदर्भातील सर्व प्रयत्नांचा आढावा घेणे आवश्यक आहे. कारण पुरोगामी महाराष्ट्रात इतर अनेक बाबींप्रमाणेच हिंदू कोड बिलाबाबत अतिशय वरवरची आणि अत्यंत त्रोटक स्वरूपाची चर्चा झाली आहे. त्यामुळे १९१९ ते १९५१ या कालखंडातील सर्व घटना जोडून अभ्यासल्यानंतर

बडोद्याच्या हिंदू कोड बिलाची भारतीय राज्यघटनेतील हिंदू कोड बिलाशी तुलना करून बडोद्याच्या हिंदू कोड बिलाने आपल्याला काय दिले या प्रश्नाचे नि:संदिग्ध उत्तर मिळू शकते.

## भारतातील हिंदू कोड बिलाची पार्श्वभूमी

हिंदू कोड बिलाबाबतची भारतातील चर्चा ही बाबासाहेबांच्या राजीनाम्यापासून सुरू होते. परंतु बाबासाहेबांच्या राजीनाम्याआधी ३२ वर्षे म्हणजे १९१९ पासून भारतात या विषयासंदर्भातील काम सुरू झाले होते. एच. एस. गौरलिखित 'The Hindu Code Bring A Codified Statement of Hindu Law With A Commentary Thereon' हा ग्रंथ १९१९ मध्ये कलकत्याहून प्रकाशित झाला. हा ग्रंथ हिंदू कोड बिलाच्या संदर्भातील एक पायाभूत दस्तावेज आहे. पुढे हिंदू कोड बिलाचा महत्त्वपूर्ण भाग असलेला 'द हिंदू वुमेन्स राईट टू प्रॉपटी ॲक्ट' १९३७ मध्ये ब्रिटिश भारतात संमत करण्यात आला. हिंदू विधवा स्त्रियांची स्थिती सुधारण्याचा उद्देश या कायद्यापाठीमागे होता. १९३९ मध्ये मुलींना वडिलांच्या संपत्तीत हक्क देण्याच्या उद्देशाने ब्रिटिश भारतातील या कायद्यात सुधारणा करण्यात आली.

२५ जानेवारी १९४१ रोजीच्या निर्णयानुसार हिंदू कायद्याचा पुनर्विचार करण्याच्या उद्देशाने ब्रिटिश सरकारने बी. एन. राव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या समितीमध्ये डॉ. द्वारकानाथ मित्तर, पुण्याचे जे.आर. घारपुरे आणि बडोदा उच्च न्यायालयाचे वकील राजरत्न वासुदेव विनायक जोशी यांचा समावेश होता.

विशेष बाब म्हणजे भारतात हिंदू कोड बिलासाठीची ही प्राथमिक समिती स्थापन होण्याआधी ८ वर्षे १९३३ मध्ये सयाजीरावांनी हिंदू कोड बिलातील शेवटचा सहावा कायदा बडोद्यात अमलात आणला होता. यातून एक बाब स्पष्ट होते की अस्पृश्यांबरोबरच स्त्रियांना त्यांचे सर्व अधिकार कोणतीही मागणी करण्याअगोदर सन्मानाने व कायदे करून सयाजीरावांनी दिले. यातून 'भारतातील सर्वात मोठे समाजक्रांतिकारक महाराजा सयाजीराव होते' हा सिद्धांत स्पष्टपणे सिद्ध होतो.

बी.एन.राव समितीने हिंदू वारसा आणि हिंदू विवाह कायद्याचा मसुदा तयार केला. ब्रिटिश केंद्रीय कायदेमंडळांच्या दोन्ही सभागृहांनी राव समितीची पुनर्रचना करून या समितीकडे सर्व हिंदू कायद्यांचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी सोपवली. १९४४ च्या सुरुवातीला या नवीन समितीचे गठन करण्यात आले. पुढच्या संपूर्ण वर्षात या समितीने भारतभर दौरा करून राव समितीने तयार केलेल्या हिंदू वारसा व हिंदू विवाह कायदे आणि सर्व हिंदू कायद्यांच्या गठनाबाबत जनतेचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या दौऱ्यादरम्यान देशभरातील विविध प्रख्यात वकील आणि प्रतिनिधी संघटनांची मते आणि पुरावे या समितीने गोळा केले.

या दौऱ्यातून हाती आलेल्या माहितीच्या आधारे हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करण्यात आला. अखेर १ ऑगस्ट १९४६ रोजी ब्रिटिश केंद्रीय कायदेमंडळात हा मसुदा मांडण्यात आला.

परंतु तेव्हा तो संमत झाला नाही. परंतु याच्या ६ महिने आधीच फेब्रुवारी १९४६ मध्ये लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये केलेल्या भाषणात प्रा.एस. वेसी-फित्झगेराल्ड यांनी राव समितीतील व्ही.व्ही. जोशींच्या योगदानाचे कौतुक करतानाच बडोदा संस्थानाने हिंदू कोड बिलांमधील कायद्यांची बी.एन. राव समितीच्या स्थापनेपूर्वीच अंमलबजावणी करून आदर्श निर्माण केल्याचे स्पष्ट केले होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ मध्ये भारत सरकारने पुन्हा एकदा हा हिंदू कोड बिलाचा मसुदा घटना समितीसमोर मांडला. परंतु परंपरावादी हिंदू गटाच्या अनपेक्षित विरोधामुळे यावेळीसुद्धा हा मसुदा संमत होऊ शकला नाही. याच दरम्यान हिंदू स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने केंद्रीय कायदे मंडळ आणि काही संस्थानांनी विविध कायदे संमत केले. १९४६ मध्ये संमत करण्यात आलेल्या 'Hindu Marriage Disabilities Removal Act' नुसार समान गोत्र आणि समान प्रवर असणाऱ्या व्यक्तींच्या विवाहांना कायदेशीर मान्यता देण्यात आली.

१९४६ मध्येच संमत करण्यात आलेल्या 'Hindu Married Women's Right To Separate Residence and Maintenance Act' नुसार हिंदू स्त्रियांना निवास आणि उपजीविकेसाठी त्यांच्या पतीच्या संपत्तीत वाटा मागण्याचा अधिकार देण्यात आला. तर १९४९ मधील 'Hindu Marriage Validating Act' नुसार विवाहामधील जातीचा अडथळा दूर

करत उच्च-कनिष्ठ जातीतील व्यक्तींच्या विवाहांना मान्यता देण्यात आली. १९४७ मध्ये मुंबई प्रांतात संमत करण्यात आलेल्या 'Bombay Hindu Divorce Act' नुसार काही ठरावीक परिस्थितींमध्ये हिंदू स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला.

अस्तित्वात असणाऱ्या हिंदू कायद्यांमध्ये एकवाक्यता प्रस्थापित करण्यासाठी संक्षिप्त नियम तयार करणे आणि बदलत्या सामाजिक गरजा व मतांनुसार प्रस्थापित नियमांमध्ये बदल करणे हा मुख्य उद्देश हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करण्यापाठीमागे होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय घटनेच्या मसुदा निर्मितीत बाबासाहेबांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे आपण अभिमानाने सांगतो. बडोद्याच्या हिंदू कोड बिलाची प्रागतिकता विचारात घेऊन घटना समितीच्या चर्चेत डॉ. पंजाबराव देशमुख, श्रीमती जयश्री, पंडित कुंझरू, श्री. भट्ट आणि श्रीमती दुर्गाबाई या पाच घटना समिती सदस्यांनी घटना समितीतील हिंदू कोड बिलाच्या चर्चेत गौरवाने आणि आदर्श कायदे म्हणून बडोद्याच्या हिंदू कोड बिलाची दखल घेतली.

परंतु दुर्दैवाने बाबासाहेबांसारख्या हिंदू कोड बिलाबाबत क्रांतिकारक भूमिका घेणाऱ्या कायदेपंडिताने बडोद्याच्या हिंदू कोड बिलाबद्दल मौन का बाळगले याचेच आश्चर्य वाटते. कारण घटना समितीतील हिंदू कोड बिलाच्या चर्चेआधी १० वर्षे १९३९ मध्ये सयाजीरावांवरील मृत्युलेखात बाबासाहेब

इंग्लंड-अमेरिकेपेक्षाही प्रगत कायदे केल्याचे श्रेय सयाजीरावांना देतात. १९५० मध्ये भारतीय संविधान अमलात आल्यानंतरदेखील हिंदू कोड बिलासाठीचा संघर्ष सुरूच राहिला. ऑक्टोबर १९५१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने महिलांच्या विविध हक्कांची मागणी करत स्त्रीसबलीकरण चळवळीला खंबीर पाठिंबा दिला. परंतु हा पाठींबा देत असताना कम्युनिस्ट पक्षाने महिलांच्या बहुतांश मागण्यांची पूर्तता करणाऱ्या हिंदू कोड बिलाबाबत मात्र कोणतीही भूमिका घेतली नाही.

याच निवडणुकीवेळी हिंदू कोड बिलाच्या मुद्द्यावरून प्रभुदत्त ब्रह्मचारी या उजव्या विचारसरणीच्या संन्याशाने पंडित नेहरूविरोधात आपली उमेदवारी जाहीर केली. त्यांना तीन उजव्या विचारसरणीच्या पक्षांनी पाठिंबा दिला. पंडित नेहरूंनी हिंदू कोड बिलाला असणारा पाठिंबा मागे घेतल्यास आपली उमेदवारी रद्द करण्याचा प्रस्ताव ब्रह्मचारींनी दिला. या प्रस्तावाला आपल्या जाहीर सभेत विरोध करताना पंडित नेहरू म्हणतात, “ही निवडणूक हरलो किंवा जिंकलो तरी मी विधिमंडळात हिंदू कोड बिल संमत करून घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीन. ही निवडणूक हिंदू कोड बिलाच्या मुद्द्यावर लढवण्याची तयारी मी केली आहे. हे मी ब्रह्मचारींना लिहून देऊ शकतो.” परंतु ब्रह्मचारींना

मिळणारा वाढता पाठिंबा पाहून कोंडीत सापडलेल्या नेहरूंनी आपली ही भूमिका बदलून हिंदू कोड बिल सुधारित स्वरूपात विधिमंडळात सादर करणार असल्याचे जाहीर केले.

१९५१ मध्येच हिंदू कोड बिलाला कायदे मंडळात होणाऱ्या विरोधाला संतापून बाबासाहेबांनी आपल्या कायदेमंत्रिपदाचा राजीनामा दिला हे जगविख्यात आहे. या पार्श्वभूमीवर बडोद्याच्या हिंदू कोड बिलाची चर्चा केली असता सयाजीरावांच्या कामाचे मोल अधिक स्पष्टपणे पुढे येते. बडोद्याच्या हिंदू कोड बिलातील पहिला कायदा हिंदू विवाह कायद्याच्या रूपाने १९०५ मध्ये लागू झाला आणि यातील शेवटचा कौटुंबिक संपत्तीतील स्त्रियांचा हक्क कायदा हा १९३३ मध्ये लागू झाला.

## बडोद्यातील हिंदू कोड बिल (१९०५-१९३३)

जानेवारी १९०५ मध्ये बडोद्यात हिंदू विवाह कायदा लागू करून हिंदूसंदर्भातील कायद्यांच्या एकत्रीकरणाला सयाजीरावांनी आरंभ केला. सयाजीरावांचे हे काम क्रांतिकारक होते. कारण भारतीय राज्यघटनेत या विषयाची चर्चा होण्याअगोदर ४५ वर्षे याची अंमलबजावणी बडोद्यात सुरू झाली होती. तर उर्वरित भारतातील हिंदू महिलांना जे हक्क मिळायला ६०-७० वर्षे संघर्ष करावा लागला ते हक्क बडोद्यातील स्त्रियांना उर्वरित भारतातील हिंदू स्त्रियांच्या अगोदर ११५ वर्षे मिळाले होते.

बडोद्याच्या या हिंदू कोड बिलाचे एकूण ६ घटक होते. १) विवाह २) दत्तक ३) पालक आणि मुले ४) वारसा हक्क ५) कौटुंबिक संबंध ६) कौटुंबिक संपत्ती. बडोद्याच्या हिंदू कोड बिलातील पहिला कायदा हिंदू विवाह कायद्याच्या रूपाने १९०५ मध्ये लागू झाला. हिंदू संयुक्त कुटुंब कायदा हा यातील दुसरा कायदा होता. या कायद्यात हिंदू कुटुंब रचना आणि संपत्तीच्या सहमालकीची वैशिष्ट्ये आणि घटनांचे विश्लेषण केले होते. संपत्तीच्या वाटणीचे परिणाम आणि कुटुंबाची पुन्हा एकत्र येण्याची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये यात सांगितली होती.

तिसऱ्या कायद्यात हिंदू कुटुंबाचे सर्वांत महत्त्वाचे सदस्य असलेल्या पालक आणि मुले यांच्यातील संबंधांची चर्चा करण्यात आली. यामध्ये आई-वडिलांचा त्यांच्या मुलांवरील पालक म्हणून असणारा सर्वोच्च अधिकार मान्य करण्यात आला. त्याचवेळी मुलांच्या पालन-पोषणाची आणि शिक्षणाची जबाबदारी पालकांवर टाकण्यात आली. तसेच वडिलोपार्जित संपत्तीवरील वडील आणि मुलाच्या अधिकाराबाबतचे नियम देखील विशद केले गेले. वडिलांनी काढलेल्या कर्जाबाबतच्या मुलाच्या जबाबदारीचे स्वरूप आणि व्याप्ती या कायद्यात निश्चित करण्यात आली. शेवटच्या हिंदू मालमत्ताविषयक कायद्यात हिंदू व्यक्तीच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनाच्या अधिकाराची चर्चा

करण्यात आली. तसेच हिंदू स्त्रीच्या स्त्रीधनावरील अधिकाराची व्याप्ती विशद करण्यात आली. हिंदू स्त्रियांचे अधिकार स्पष्ट करतानाच यासंबंधीचे कुटुंबातील इतर व्यक्तींचे हक्कदेखील स्पष्ट करण्यात आले.

१९११ पर्यंत यातील चार कायदे बडोद्यात लागू करण्यात आले. तर शेवटचा सहावा हिंदू स्त्रियांचा संपत्तीतील हक्कांसंदर्भातील कायदा १९३३ मध्ये पास झाला. हिंदू धर्माच्या अधिकृत ग्रंथातील तत्त्वांचा आधार घेऊन याची मांडणी करण्यात आली होती. १९४२ मध्ये हिंदू कोड बिलात दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीनुसार एक विवाहास हिंदू कायद्याचा भाग बनवण्यात आले.

सयाजीरावांच्या या ऐतिहासिक कामाची नोंद घेऊन हिंदू कायद्यांमध्ये सुधारणा आणि संशोधनासाठी स्थापन झालेल्या 'द ऑल इंडिया हिंदू लॉ रिफॉर्म अँण्ड रिसर्च असोसिएशन' या मुंबई स्थित संस्थेने महाराजांना १९२९ मध्ये आश्रयदाते होण्याचे निमंत्रण दिले होते. त्या निमंत्रणाचा स्वीकार करणाऱ्या ३ ऑगस्ट १९२९ च्या पत्रात सयाजीराव लिहितात, 'द ऑल इंडिया हिंदू लॉ रिफॉर्म अँण्ड रिसर्च असोसिएशन' चे आश्रयदाते म्हणून आपण मला आमंत्रित करीत आहात. मी आनंदाने त्यासाठी तयार आहे. अशा चळवळीला माझा पाठिंबा आहे. अशी चळवळ यशस्वी आणि उपयोगी सिद्ध व्हावी."

लोकशाही भारताला पथदर्शक ठरेल असे हिंदू कोड बिलाचे काम स्वातंत्र्यपूर्व काळातच महाराजांनी करून ठेवले होते. हे कायदे करण्यासाठी हिंदू धर्मशास्त्राचा व्यासंग आवश्यक होता. सयाजीरावांनी राज्याधिकार मिळाल्यापासूनच हिंदू धर्मशास्त्राचा आपला व्यासंग जगातील प्रमुख धर्मशास्त्रांच्या तुलनात्मक अभ्यासातून किती परिपूर्ण केला होता आणि दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्षपद त्यांना वारंवार विनंती पत्रे पाठवून सन्मानाने का दिले गेले होते याचा उलगडा महाराजांच्या धर्मविषयक भाषणातून होतो.

## हिंदू विवाह कायदा - १९०५

बडोद्याच्या हिंदू कोड बिलातील पहिला हिंदू विवाह कायदा सयाजीरावांनी १९०५ मध्ये लागू केला. हिंदू विवाह कायदा करणारे बडोदा हे ब्रिटिश भारत आणि तत्कालीन ५६५ संस्थानातील पहिले संस्थान आहे. हा कायदा करून सयाजीरावांनी भारतातील हिंदू कोड बिलाची पायाभरणी केली. या कायद्यात हिंदू लग्नाच्या मूलतत्वांची व्याख्या करून, कायदेशीर लग्नाच्या अवश्य गोष्टी, स्त्री-पुरुषांचे परस्पर हक्क, त्यांचे मिळकतीवरील अधिकार, एकमेकांबद्दलची जबाबदारी व लग्न संबंधाची अविछीन्नता या सर्व गोष्टी निश्चित करण्यात आल्या. यापूर्वी हिंदुंतील कित्येक हलक्या जातींत लग्नाचे

असे काही निश्चित विधी नसल्यामुळे वादग्रस्त प्रसंगी लग्नाची कायदेशीरता सिद्ध करणे कठीण होई. ती अडचण या कायद्याने नष्ट केली.

बडोद्याच्या या कायद्यात १९२८ मध्ये जी दुरुस्ती करण्यात आली ती भारतातील सामाजिक कायद्यांच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरावी. कारण या सुधारणेनुसार लग्नविधीच्या वेळी जे वैदिक मंत्र म्हटले जातात त्यांचा अर्थ पुरोहिताने वधू वरांना त्यांच्या मातृभाषेत सांगणे बंधनकारक केले. तसे न केल्यास त्याला ५०रु. दंड करण्याची तरतूद केली. अशा प्रकारची तरतूद असणारा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतात आजअखेर एकही कायदा अस्तित्वात आला नाही. हा कायदा म्हणजे सामाजिक सुधारणांसाठीच्या कायद्याच्या इतिहासातील एक क्रांतिकारक टप्पा आहे.

हिंदू परंपरेनुसार वधूच्या पित्याचे गोत्र व प्रवर हे पतीच्या गोत्र प्रवराहून भिन्न असणे गरजेचे होते. १९३२ मध्ये या कायद्यात केलेल्या सुधारणेनुसार हे निर्बंध काढून सगोत्र विवाहास कायदेशीर मान्यता देण्यात आली. १४ वर्षानंतर १९४६ मध्ये ब्रिटिश भारतात लागू करण्यात आलेल्या 'Hindu Marriage Disabilities Removal Act' मध्ये समान गोत्र व प्रवराच्या व्यक्तींच्या विवाहाला परवानगी देण्यात आली.

या संदर्भात रियासतकार सरदेसाई लिहितात, “भारताच्या सामाजिक व वैचारिक जीवनाच्या सुधारणेंत सयाजीरावांचा भाग केवढा मोठा आहे याची आता बाहेर फारशी कोणास कल्पना नाही. हळूहळू पन्नास-साठ वर्षें ही सुधारणा केवळ सयाजीरावांच्या पुरस्काराने सर्व देशांत न समजता घडून येत होती. विधवा-विवाह, वधूवरांचे योग्य वय, स्पृश्यास्पृश्य, जातिभेदाचें निर्मूलन इत्यादी विषयांचे कायदे व आचार प्रत्यक्षात आणणारे पहिले सत्ताधीश सयाजीराव होत.” रियासतकारांनी नोंदवलेले हे मत भारतीय सामाजिक सुधारणांच्या इतिहासातील सयाजीरावांचे ‘अनन्य’ स्थान स्पष्ट करते.

दहा खंडात एकूण ६,५०० पृष्ठांचा ‘हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास’ लिहिणारे भारतरत्न डॉ.पी.व्ही. काणे हिंदू धर्माच्या मर्यादा सांगताना म्हणतात, “बहुतेक हिंदूंना एकत्र करतील अशा फक्त काही थोड्या बाबी आहेत. त्या म्हणजे कर्म आणि पुनर्जन्माचा सिद्धांत, विस्तृत आणि मानास्पद असे संस्कृत वाङ्मय, वेदांबद्दल पूज्यता, मानससरोवरापासून रामेश्वरापर्यंतची तीर्थक्षेत्रे या होत. परंतु सर्व हिदूंमध्ये परिणामकारक ऐक्य उत्पन्न होण्यास या थोड्या गोष्टी, पुरेशा नव्हत्या. आमच्यातील पुष्कळ लोक योग्यता नसूनही अध्यात्मवादी बनले, आचारांत आणि विचारांत फार मोठे अंतर पडले असून परधर्मात गेलेल्यांना परत घेण्यात आले नाही, अस्पृश्यता मानण्यात येत असे इत्यादी दोष आमच्या समाजात होते आणि आहेत.” या भाषणात

काणेंनी जे मुद्दे अग्रक्रमाने मांडले आहेत, त्या मुद्द्यांसंदर्भातील धार्मिक आणि सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम, काणेंनी हिंदू धर्मशास्त्राचा इतिहास लिहिण्याअगोदर सयाजीरावांनी बडोद्यात यशस्वी केला होता.

स्वतंत्र भारतात १९५५ मध्ये Hindu Marriage Act संमत करण्यात आला. या कायद्यात विवाहासाठीचे विधी आणि पद्धती निश्चित करण्यात आल्या. त्याआधी ५० वर्षे १९०५ च्या हिंदू विवाह कायद्यात सयाजीरावांनी हिंदू लग्नाच्या मूलतत्त्वांची व्याख्या करतानाच लग्न करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे परस्परसंबंधातील हक्कदेखील निश्चित केले होते.

## हिंदू दत्तक नोंदणी कायदा - १९१०

हिंदू कोड बिलासंदर्भातील दुसरा महत्वाचा 'हिंदू दत्तक नोंदणी कायदा' सयाजीरावांनी १९१० मध्ये बडोद्यात लागू केला. हिंदू धर्म परंपरेनुसार कोणत्याही व्यक्तीला केवळ त्याच्या रक्तसंबंधातील व्यक्तीलाच दत्तक घेता येत होते. तसेच प्रत्येक व्यक्तीला दत्तकप्रसंगी दत्तक होम विधी करणे बंधनकारक होते. १९१० च्या या कायद्यानुसार दत्तक होम विधीची प्रथा संपुष्टात आणताना ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या सर्वांसाठी दत्तक होम विधी अनावश्यक ठरवण्यात आला. महाराजांचे हे सर्व प्रयत्न म्हणजे हिंदू धर्माभोवती शेकडो वर्षे कर्मकांडाची जी भली मोठी वारुळे वाढली होती ती काढण्याचाच प्रयत्न होता.

१९२७ मध्ये या कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणेनुसार इतर सामान्य कायद्यांचे निर्बंध पाळून कोणताही सजातीय मुलगा दत्तक घेण्यास परवानगी देण्यात आली. पुढे १९२९ मध्ये बॅ.जयकर यांनी अशाच स्वरूपाची सुधारणा ब्रिटिश भारतातील कायद्यात सुचवणारे बिल मुंबई कायदे मंडळात आणले. परंतु ते मंजूर झाले नाही. महाराज समाज सुधारणेसाठी फक्त कायदे करत नव्हते तर संबंधित विषयातील मूळ धर्मग्रंथांचे अनुवाद करून लोकांची धर्म साक्षरताही वाढवत होते. दत्तक विधीबाबत माहिती देणारा ‘दत्तकचंद्रिका’ या ग्रंथाचा सुरतकर यांनी केलेला मराठी अनुवाद महाराजांनी प्रसिद्ध केला होता.

## हिंदू घटस्फोट कायदा - १९३१

ब्रिटिश भारतात घटस्फोट कायदा १८६९ मध्ये लागू झाला. तो कायदा ख्रिश्चन धर्मीयांसाठी होता. १९३१ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात लागू केलेला हिंदू घटस्फोट कायदा हा हिंदू कोड बिलाच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पा होता. कोर्टात नोंदणी केल्याशिवाय घटस्फोट मान्य केला जाणार नाही अशी या कायद्यात तरतूद होती. या कायद्यानुसार कोणत्याही स्त्रीच्या पतीचा मृत्यू होऊन ७ वर्षे झाली असतील, त्याने संन्यास घेतला असेल, त्याने धर्मांतर केलेले असेल किंवा तो नपुंसक असेल तर त्या स्त्रीला अशा लग्नातून घटस्फोट मागण्याचा अधिकार या

कायद्याने दिला. तसेच जर पती पत्नीला अमानुष वागणूक देत असेल, तो व्यसनात मग्न असेल व त्याला वाईट कर्म करण्याची सवय असेल तरीही स्त्रीला घटस्फोट मागण्याचा अधिकार होता.

याबरोबर जर पत्नी लग्नाच्या वेळी इतर पुरुषाकडून गरोदर असल्याचे लग्नानंतर पतीला आढळून आल्यास किंवा पत्नीने दुसरा पती केला असेल, तर त्या पुरुषाला आपल्या पत्नीविरुद्ध घटस्फोट मागण्याचा अधिकार होता. अशा प्रकारच्या घटस्फोट मागणीशिवाय वरील कारणापेक्षा कमी महत्त्वाच्या कारणांमुळे झालेला विवाह कायम ठेवून पती पत्नीला वेगवेगळे राहण्याची व्यवस्था व लग्नाच्या हक्कांच्या अधिकाराची व्यवस्थाही या कायद्यान्वये करण्यात आली होती. या मुख्य कलमांबरोबरच पत्नीच्या व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाह आणि संगोपनाची व्यवस्था करण्याबद्दलचे नियमही या कायद्यात करण्यात आले होते.

सयाजीरावांनी केलेल्या कायद्यांचा इतिहास तपासला असता अनेक वर्षांचे चिंतन मंथन झाल्यानंतरच संवेदनशील विषयावरील कायदे करण्यात आले होते असे दिसते. त्यामुळेच बडोद्यातले कायदे आदर्श आणि परिणामकारक ठरले होते. तसेच या कायद्यांचे अनुकरण इतर संस्थाने आणि खुद्द ब्रिटिश सरकारनेही केले होते. म्हणूनच प्र.के.अत्रे म्हणतात,“सामाजिक क्षेत्रात महाराजांनी सर्वांत जी क्रांतिकारक सुधारणा केली, ती म्हणजे घटस्फोटाच्या कायद्याची. ब्रिटिश हिंदुस्थानात त्या वेळी

या कायद्याची वार्ताही नव्हती. पण महाराजांनी पुढाकार घेऊन हा कायदा पास केला. त्याचा फायदा बडोदे संस्थानातल्या लोकांपेक्षा बाहेरच्याच लोकांनी बडोद्यात जाऊन घेतला.” यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

## हिंदू स्त्रियांचा संपत्तीतील हक्क कायदा – १९३३

१९३३ मध्ये हिंदू स्त्रीला संपत्तीतील हक्क हा हिंदू कोड बिलातील शेवटचा सहावा कायदा करून सयाजीरावांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील हिंदू कोड बिलाची ‘दिशा’ निश्चित केली. वारसा हक्काने हिंदू महिलांना संपत्तीत हिस्सा देणारे बडोदा हे देशातील पहिले संस्थान आहे.

१९३३ च्या या कायद्यात पुढील तरतुदी करण्यात आल्या होत्या. -

१) संयुक्त कुटुंबात नवरा जर कुटुंबप्रमुख असेल तर त्याच्या मृत्यूनंतर ती स्त्री कुटुंबाच्या संपत्तीत सहहिस्सेदार बनते, वंशपरंपरेने किंवा वाटणीद्वारे मिळणाऱ्या संपत्तीची ती मालकीण आहे.

२) तिच्या पतीने स्वतंत्रपणे निर्माण केलेल्या संपत्तीची ती वारसदार आहे व तिच्या मुलांबरोबर त्या संपत्तीत तिचाही वाटा आहे.

३) विधवेला तिच्या संपत्तीचा शिक्षणासाठी व धर्मादाय कारणासाठी उपयोग करण्याचा अधिकार आहे.

४) अविवाहित मुलींना वडिलोपार्जित संपत्तीत त्यांच्या भावांबरोबरच हक्क आहे.

५) विशिष्ट परिस्थितीत विवाहित व विधवा स्त्रीला तिच्या उपजीविकेसाठी वडिलांच्या संपत्तीवर दावा सांगता येईल.

६) विधवा सुनेला वारसाच्या यादीत समाविष्ट करण्यात यावे.

७) मृत मुलीच्या मुलांना जिवंत मुलींबरोबर संपत्तीत वाटा देण्यात यावा.

मृत मुलींच्या मुलांना जिवंत मुलींबरोबर संपत्तीत वाटा देण्याची सयाजीरावांनी केलेली तरतूद स्वतंत्र भारतात ७० वर्षांनंतरदेखील लागू होऊ शकली नाही यातच सयाजीरावांच्या या कायद्याचे क्रांतिकारकत्व लपले आहे. १९३३ च्या कायद्यामुळे स्त्रियांचा हिंदू कुटुंबातील दर्जा व वैवाहिक स्थान उंचावले. महिला सबलीकरणाचे भारतातील स्वातंत्र्योत्तर काम पाहता आजही भारतातील महिलांना मंदिर प्रवेशासाठी आंदोलने, कोर्ट-कचेऱ्या कराव्या लागतात. कायदे झाले तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते. राज्यघटना लागू केल्यानंतर ७० वर्षांनी लोकशाहीची मूल्ये रुजवण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. या पार्श्वभूमीवर या कायद्याद्वारे राबवलेल्या योजना आजही मार्गदर्शक आहेत.

२९ जानेवारी १९२७ रोजी बडोदा येथे केलेल्या भाषणात हिंदू स्त्रियांच्या उन्नतीबाबतची आपली भूमिका स्पष्ट करताना महाराजांनी व्यक्त केलेले चिंतन मौलिक आहे. बडोद्याच्या हिंदू

कोड बिलातील हा शेवटचा कायदा महाराजांच्या या भाषणाच्या पार्श्वभूमीवर समजून घेणे उद्बोधक ठरते. महाराज म्हणतात, "हिंदू समाजात आज असा एक वर्ग आहे की, तो स्त्रिया आणि अत्यंज सारखेच मानतो. उच्च ब्राह्मणवर्गाच्या स्त्रियांचा दर्जाही त्यांच्या दृष्टीने खालचाच आहे. पण धर्माच्या आणि नीतिशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास ही चूक आहे. कोणीही माणूस जन्मत: उच्च किंवा नीच नसतो. गुणकर्माप्रमाणे तो तसा होतो. मोठे काम किंवा हलके काम परिस्थितीप्रमाणे माणसाला मिळत असते. तेव्हा हलके काम करणाऱ्याकडे क्षुद्रपणाने कोणी पाहू नये. खरा मनुष्यधर्म हाच आहे; पण देशाचे दुर्दैव असे आहे की, आपल्या समाजाची धार्मिक आणि नैतिक स्थिती खालावली असून, समाजाला दुर्दशा भोगावी लागत आहे. तेव्हा जोपर्यंत आपली सामाजिक नीती सुधारणार नाही व आपण जन्मावरूनच उच्च-नीचपणा ठरवू पाहणार, तोपर्यंत आपली उन्नती होणार नाही." स्वातंत्र्योत्तर भारताच्या हिंदू कोड बिलाच्या मसुद्यात महिलांना उपजीविकेसाठी पतीच्या संपत्तीत वाटा आणि स्वतःच्या वडिलांच्या वंशपरंपरागत संपत्तीत हिस्सेदारी या दोन बाबी मांडण्यात आल्या होत्या. याच तरतुदी त्याआधी १४ वर्षे सयाजीरावांनी १९३३ च्या कायद्याद्वारे बडोद्यात अमलात आणल्या होत्या.

ब्रिटिश भारतात 'द हिंदू वुमेन्स राईट टू प्रॉपटी ॲक्ट' हा कायदा १९३७ मध्ये म्हणजेच बडोद्यानंतर ४ वर्षांनी पास झाला. स्वतंत्र भारतात १९५६ मध्ये 'Hindu Succession Act' पास करण्यात आला. या कायद्यातील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास केला असता १९३३ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात लागू केलेला हा कायदा अधिक प्रगत होता हे मान्य करावे लागते.

१८ मार्च १९६३ रोजी दैनिक मराठामध्ये महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त लिहिलेल्या अग्रलेखात प्र.के. अत्रे यांनी एकूणच सयाजीरावांच्या कर्तृत्वाचा नेमकेपणाने वेध घेतला आहे. या लेखातील हिंदू कोड बिलासंदर्भातील त्यांचे भाष्य या कायद्याच्या निमित्ताने विचारात घेणे आवश्यक आहे. अत्रे म्हणतात, "१९०५ साली महाराजांनी 'हिंदू कायदा' कोडाच्या स्वरूपात प्रसिद्ध करून जे ब्रिटिशांना हिंदुस्थानात शक्य झाले नाही, एवढेच नव्हे तर आता काँग्रेसच्या राज्यात कायदेमंत्री डॉ. आंबेडकरांनाही करता आले नाही, ते त्यांनी करून दाखवले." अत्रेंचे हे विश्लेषण महाराष्ट्राने वेळीच गंभीरपणे घेतले असते तर शिवाजी महाराजांच्या नंतरचा महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा जनसामान्यांपर्यंत पोहोचला असता.

आपला एकारलेला आणि व्यक्तिकेंद्री इतिहास आपण वेळीच दुरुस्त केला नाही तर तो इतिहास अधिक विखारी होतो. असा इतिहास पुढील अनेक पिढ्यांना अधोगतीकडे नेणारा ठरतो हे आजवरच्या अनुभवातून शिकण्याची वेळ आता आली आहे.

नवा इतिहास नेहमीच धक्का देणारा असतो. असे असले तरी नवा इतिहासच समाजाला दुरुस्तही करत असतो. सयाजीरावांच्या निमित्ताने आपला हा 'गाळलेला' इतिहास शोधून जोडण्याची प्रेरणा नव्या पिढीने घेऊन, प्रसंगी किंमत मोजण्याची तयारी ठेवून, शोधण्याची आणि मांडण्याची आज नितांत गरज आहे.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com